| |
|---|
| नि.फौ.ख.क्र.७५६/२०१३ |
| सरकार -वि- शांता वगैरे |
| निशाणी क्र.४२ |

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांची शपथेवर सरतपासणी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | मनोज दिगंबर मोहीते |
| **वय** | : | ४७ वर्ष |
| **धंदा** | : | वन परिक्षेत्र अधिकारी, नाकाडोंगरी, जि.भंडारा |
| **राहणार** | : | नाकाडोंगरी, जि. भंडारा |

**<u>सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. संजयकुमार गाडगे यांचेमार्फत</u>**

दिनांक ०६.१०.२०१२ रोजी मी लकडगंज-२ येथे वनपाल म्हणून कार्यरत होतो. गुन्हे शाखेने आरोपींच्या घरातील हरणांची शिंगे जप्त केली असल्याची माहिती मला दिली. त्यांनी त्याबाबत कार्यालयाला पत्र दिले होते. पत्रासोबत घरझडती पंचनामा दिला होता.

२. मी व सुरक्षारक्षक आरोपींच्या घरी गेलो. तिथे आम्ही मौका पंचनामा पंचासमक्ष केला. आता मला निशाणी क्र.३१ कडील मौका पंचनामा दाखवला, तो तोच आहे. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावेळी जप्त शिंगे माझ्यासोबत होते. ती आरोपींना दाखवण्यात आली. मी वन गुन्हा क्र.१/२३ नोंद केला. आता मला त्याबाबत छापील प्रथम खबर दाखवली, ती तीच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.४३** देण्यात येते.

३. पोलीसांकडून जी हरणांची दोन शिंगे व काळविटाची दोन शिंगे प्राप्त झाली होती ती जप्त करुन जप्ती पंचनामा केला. आता मला निशाणी क्र.३२ कडील पंचनामा दाखवला, तो तोच आहे. त्यावर माझी, आरोपींची व पंचाची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. वन रक्षक श्री. शेंदरे यांना शिंगे सुपूर्द केल्याबद्दल त्यांनी पंचनाम्यावर सही केली आहे.

४. मी आरोपींचे बयान सहाय्यक वन संरक्षक श्री. अंजीकर व वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. नंदनवार यांच्यासमोर घेतले. आरोपींकडून चौकशीत सहकार्य करण्याबाबत हमीपत्र घेतले. आता मला ते हमीपत्र दाखवले. त्यावर माझी व आरोपींची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यांना **अनुक्रमे निशाणी क्र.४४ व ४५** देण्यात येते. श्री. शेंदरे यांनी शिंगे मिळाल्याबद्दल निशाणी क्र.३३ कडील सुप्रतनामा दिला होता. साक्षीदारांचे बयान मी सहाय्यक वन संरक्षक श्री. अंजीकर व वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. नंदनवार यांच्यासमोर नोंदवले.

५. जप्त शिंगे परिक्षणासाठी वनपरिक्षेत्र अधिकारीमार्फत पाठविण्यात आले. परिक्षण अहवाल प्राप्त झाला. तो याकामी दाखल आहे. त्यास **निशाणी क्र.४६** देण्यात येते. त्यानंतरची तपास कार्यवाही वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. नंदनवार यांनी केली. जप्त शिंगे दाखवल्यास मी ओळखु शकेन. आता मला ती शिंगे दाखवली. त्यातील दोन शिंगे काळविटाची व दोन शिंगे हरणांची आहेत. त्यांना **अनुक्रमे आर्टीकल-ए ते डी** देण्यात येते. आरोपी आज हजर आहेत.

**सरतपास संपला**

**<u>उलट तपास आरोपींतर्फे अधिवक्ता श्री. चेतन ठाकूर यांचेमार्फत</u>**

६. शिंगे मी जप्त केले नाही, हे म्हणणे खरे आहे. गुन्हे शाखेने शिंगे जप्त केली होती असे मी खोटे सांगतो, हे म्हणणे खरे नाही. घरझडती जप्ती पंचनामा करण्यापूर्वी गुन्हे शाखेने मला घटनास्थळी बोलावले नव्हते, हे म्हणणे खरे आहे. मौका पंचनाम्यावर गुन्हे शाखेचे अधिकारी श्री. चौधरी यांची सही घेतली नाही. कोणतीही शिंगे आरोपींच्या घरात आढळून आली नव्हती, हे म्हणणे खरे नाही. मौका पंचनाम्यातील मजकूर खोटा आहे, हे म्हणणे खरे नाही. मौका पंचनाम्यावर आरोपींच्या सह्या नाहीत, हे म्हणणे खरे आहे.

७. मी आरोपींचे बयान सहाय्यक वन संरक्षक श्री. अंजीकर व वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. नंदनवार यांच्यासमोर घेतले असे मी खोटे सांगतो, हे म्हणणे खरे नाही. सदरचे अधिकारी हजर असल्याचे मी खोटे सांगतो, हे म्हणणे खरे नाही. मी आरोपींविरुध्द खोटा गुन्हा दाखल केला, हे म्हणणे खरे नाही. आरोपींच्या घराशेजारील इसमांचे बयान मी नोंदवले नाहीत. गुन्हे शाखेचे अधिकारी श्री. चौधरी यांचे बयान मी घेतले नाही. आर्टीकल-ए ते डी कडील शिंगे आरोपींच्या घरातून मिळाले नाही, हे म्हणणे खरे नाही. गुन्हे शाखेचे अधिकारी यांनी सदरची शिंगे आमच्या कार्यालयात सुपूर्द केली होती. माझ्या सरतपासातील साक्ष खोटी आहे, हे म्हणणे खरे नाही.

**उलटतपास संपला**
**फेरतपास – नाही**

वा.दा.ब.असे कबुल केले
समक्ष

(यु.पी. कुलकर्णी)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दिनांक २९.०१.२०२४